नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियाची स्थापना पुस्तकांचा प्रचार आणि वाचन अभिरुचीचा विकास या उद्देशाने सन 1957 मध्ये भारत सरकारच्या (उच्च शिक्षण विभाग, मनुष्य संसाधन विकास मंत्रालय) द्वारा केली गेली आहे. लहान मुलांच्या पुस्तकांच्या प्रकाशनास संस्थेतर्फे नेहमीच प्राथमिकता दिली जाते. भारतातील वेगवेगळ्या वयोगटांतील मुलांसाठी प्रथितयश बहुभाषिक बाल-वाङ्मय प्रकाशन असलेल्या ट्रस्टने आतापर्यंत इंग्रजीसहित 30 पेक्षा अधिक भाषा आणि बोलींमधील रंगीत आणि सचित्र पुस्तके मुलांना त्यांच्या मातृभाषेतून उपलब्ध करून दिली आहेत. बाल आणि कुमारवयीन मुलांसाठी असलेली ही सर्व पुस्तके नेहरू बाल पुस्तकालय ह्या मालिकेद्वारा प्रकाशित केली जातात.



आगरताळा (त्रिपुरा) येथील लेखक-चित्रकार कार्यशाळेत
मार्च 2008 मध्ये या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

ISBN 978-81-237-9023-7

पहिली आवृत्ती : 2019 (*शके* 1941)

Banat Rongor Mela (*Asamiya Original*)
Jangalateel Anand (*Marathi*)

₹ 55.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज–II
वसंतकुंज, नवी दिल्ली 110070 यांनी प्रकाशित केले.
www.nbtindia.gov.in


नेहरू बाल पुस्तकालय

जंगलातील आनंद

शंतनू तमुले

अनुवाद : विद्या खुर्जेकर

रेखाचित्रे : दुर्लभ भट्टाचार्य



nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया





मनु काझीरंगा जंगलातील एका खेड्यात राहत असे.
बऱ्याचदा तो म्हशीवर बसून जंगलात फेरफटका मारीत असे.

एके दिवशी त्याला म्हशीचे शिंग सापडले. त्याने ते उचलून घेतले.







मनू घरी आल्यावर त्याने ते शिंग वडिलांना दिले आणि म्हणाला, ‘‘बाबा, कृपा करून माझ्यासाठी ह्या शिंगाची एक तुतारी तयार करून द्याना.’’

त्याच्या वडिलांनी त्याच्यासाठी एक छानशी तुतारी बनविली.




मनू लवकरच तुतारी वाजवायला शिकला. एक दिवस तुतारी वाजवण्यात तो अगदी तल्लीन झाला होता. थोड्याच वेळात त्याच्या लक्षात आले की तो जंगलाच्या अगदी आतील भागात पोहोचला आहे. तो जंगलातील पशु-पक्ष्यांच्या आनंदासाठी तुतारी वाजवू लागला.

जसजसा मनू तुतारी वाजवू लागला, जंगलातील प्रत्येक गोष्ट बदलू लागली. ते जंगल सुंदर फुलांनी भरून गेले. हे पाहून मनूला खूप आनंद झाला.





पक्ष्यांनीसुद्धा गायला सुरुवात केली. माकडांच्या एका झुंडीने या झाडावरून त्या झाडावर आनंदाने उड्या मारण्यास सुरुवात केली, तर हरणं उड्या मारत नाचू लागली.



मनूने हत्तींचा एक कळप येत असलेला पाहिला. त्याने तुतारी वाजविणे सुरूच ठेवले. कळपातील हत्तींनी त्याच्याकडे पाहून आपल्या सोंडा उंचावल्या आणि मोठ्या आनंदाने ते चित्कार करू लागले.

मनू तळ्याकाठी गेला. त्याने जसजशी तुतारी वाजविणे सुरू केले, तळ्यातील मासे आनंदाने पोहू लागले आणि उबदारपणा अनुभवत उन्हात बसलेली कासवं उड्या मारत पाण्यात गेली.






मनूने एका झुडपाच्या मागे वाघाचे दोन बछडे पाहिले. त्याने तुतारी वाजवायला सुरुवात करताच ते बछडे एकमेकांच्या अंगांवर लोळू लागले.



त्यानंतर त्याला चिखलात लोळणारा एक गेंडा दिसला. मनू त्याची तुतारी वाजवतच होता. वेदना होत असल्याप्रमाणे तो गेंडा पाणावलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे एकटक पाहू लागला.






मनू घरी परतला. तो वडिलांना म्हणाला, ‘‘बाबा, मी जेव्हा तुतारी वाजवित होतो तेव्हा जंगलातील सर्व पशू आणि पक्षी खूप आनंदले होते, पण एक गेंडा मात्र खूप दुःखी का होता?’’

मनूचे बाबा म्हणाले, ‘‘अरे शिकारी गेंड्यांना मारून त्यांची शिंगं नेतात म्हणून कदाचित ते दुःखी असतील.’’


‘‘आपण त्यांना वाचवू शकत नाही का?’’







‘‘का नाही? आपली इच्छा असेल तर आपण त्यांना जरूर वाचवू शकतो. संकटात असलेल्या प्राण्यांची आपण मदत केलीच पाहिजे,’’ बाबा म्हणाले.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे मनू म्हशीवर बसून पुन्हा एकदा त्या गेंड्याला पाहण्यासाठी जंगलात गेला, पण तो तिथे नव्हता. तो गेंडा एका सापळ्यात अडकला होता. त्या गेंड्याच्या शेजारी त्याचे लहान पिल्लूही होते. मनू ताबडतोब घरी परतला आणि वडिलांना म्हणाला, ''बाबा, तो गेंडा सापळ्यात अडकला आहे. काहीही करून लवकरात लवकर त्याला वाचवायला हवे.''





मनूच्या वडिलांनी लगेचच काही गावकऱ्यांना बोलावले आणि ते ज्या ठिकाणी गेंडा सापळ्यात अडकला होता तिथे गेले. अगदी वाईट अवस्थेत गेंडा सापळ्यात अडकला होता. त्याला मारून त्याचे शिंग मिळवण्यासाठी काही शिकाऱ्यांनी त्याला अडकवले होते.





गावकऱ्यांनी गेंडा ज्या खंदकात अडकला होता त्याच्याच शेजारी दुसरा एक चर खोदला. आता तो खंदक एका अरुंद बोळासारखा तयार झाला, जेणेकरून तो गेंडा त्यावरून बाहेर पडू शकला असता. गेंड्याच्या लहान पिलाला गावकऱ्यांनी हळुवारपणे उचलून घेतले.





त्या गेंड्याने बाहेर पडावे यासाठी सर्व गावकरी खंदकाच्या बाजूला उभे राहिले, पण तो गेंडा काही बाहेर येईना. त्यामुळे सर्वांना काळजी वाटू लागली.

त्याचवेळी मनूने त्याची तुतारी वाजवायला सुरुवात केली. त्या तुतारीचे स्वर ऐकून तो गेंडा उठला आणि हळूहळू खंदकाच्या बाहेर पडला.




मनुने तुतारी वाजविणे सुरूच ठेवले होते. हळूहळू तो गेंडा त्याच्या पिलाबरोबर जंगलात अदृश्य झाला.





Lasertypeset by Mac Script, Pune-411007 and
printed at India Offset Press, New Delhi



nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 55.00
ISBN 812379023-6
9 788123 790237
19201716
Joy in The Jungle
(Marathi)

जंगलातील आनंद

शंतनू तमुले

अनुवाद : विद्या खुर्जेकर

रेखाचित्रे : दुर्लभ भट्टाचार्य

